**ठळक बातम्या**

- वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन, राज्यात सर्वत्र सामूहिक वंदे मातरम गायनाचं आयोजन

- पुण्यातल्या कोरेगाव पार्क इथल्या जमीन व्यवहार प्रकरणी तहसीलदार आणि दुय्यम निबंधक निलंबित

- क्रिकेट विश्वचषक विजेत्या महिला संघातल्या महाराष्ट्रातल्या खेळाडूंचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

- आयुका या संस्थेचे माजी संचालक आणि विख्यात शास्त्रज्ञ प्राध्यापक नरेश दधिच यांचं निधन

**आणि**

- ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांच्यावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाची आज सुरुवात झाली. हे गीत बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी दीडशे वर्षांपूर्वी लिहिलं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं ‘वंदे मातरम्’ शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं उद्घाटन केलं. ‘वंदे मातरम्’ हा एक मंत्र आहे, एक ऊर्जा आहे, एक स्वप्न आणि एक संकल्प आहे, असं प्रधानमंत्र्यांनी या कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितलं. हे गीत म्हणजे भारतमातेप्रति भक्ती आणि आदर व्यक्त करणारा भाव आहे, जो आपल्याला इतिहासाशी जोडतो, वर्तमानात आत्मविश्वास निर्माण करतो आणि भविष्यासाठी नवसंजीवनी देतो, असंही ते म्हणाले.

**होल्ड-- बाईट - प्रधानमंत्री**

या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी एक विशेष टपाल तिकीट आणि नाणं प्रकाशित केलं. तसंच ‘vandemataram150.in’ हे विशेष पोर्टलही सुरू केलं. वंदे मातरम् या गीताच्या

शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त देशभरात वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रीय गीत वंदे मातरमच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त अभिवादन केलं आहे. स्वातंत्र्यसमराच्या काळात ब्रिटिशांच्या विरोधात सन्यांशांनी पुकारलेल्या बंडाच्या वेळी बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी या अमर गीताची रचना केली होती, असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला अभिवादन केलं. हे राष्ट्र भावना जागवणारं आणि पिढ्यांना प्रेरणा देणारं शाश्वत गीत आहे, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त संशोधक आणि संगीत संग्राहक मिलिंद सबनीस यांची विशेष मुलाखत आज रात्री ८ वाजता दिल्लीवरून प्रसारित होणार आहे. मुंबईसह राज्यातली सर्व केंद्रं ही मुलाखत सहक्षेपित करतील. त्यामुळे रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्र आज ८ वाजून ३० मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><><>**

'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताला आज दीडशे वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त राज्यात सगळीकडे वंदे मातरम् या गीताचं स्मरण करण्यात आलं. मुंबईमध्ये राजभवनात राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती यांच्या उपस्थितीत तर मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत वंदे मातरम् गीताचं सामूहिक गायन करण्यात आलं. यावेळी मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री आशिष शेलार आणि इतर मान्यवर उपस्थित होते. मुंबई विद्यापीठातही कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत वंदे मातरमचं सामूहिक गायन करण्यात आलं.

**ठाणे** महापालिकेतही अधिकारी आणि कर्मचारी यांनी वंदे मातरम गायनाने या राष्ट्रीय गीताचा स्मरणोत्सव साजरा केला. **पालघरच्या** जिल्हाधिकारी कार्यालयात विविध वाद्यांसह सामुहिकरीत्या वंदे मातरम् गीताचं गायन तसंच पथनाट्य देखील सादर करण्यात आलं. **धुळे** शहरात इतिहासाचार्य राजवाडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देवपूर धुळे

इथं 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन करण्यात आलं. **सोलापूरमध्ये** ४५ शाळा-महाविद्यालयातल्या सुमारे १० हजार विद्यार्थ्यांनी आज वंदे मातरम हे गीत म्हटलं. **पनवेलमध्ये** महाराष्ट्रभूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि चांगु काना ठाकूर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सामूहिक 'वंदे मातरम्' गायनाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**हिंगोलीमध्ये** जिल्हा परिषद मैदानावर वंदे मातरमचे सामूहिक गायन करण्यात आलं. यावेळी वंदे मातरम् गीता संदर्भात सखोल माहिती देण्यात आली. **गोंदियाच्या** इंदिरा गांधी स्टेडियममध्ये आज वंदे मातरम गीताचं सामूहिक वाचन करण्यात आलं. **वाशीम, अकोला सांगली, नाशिक** या जिल्ह्यांमध्येही वंदे मातरम गीताचं सामूहिक गायन करण्यात आलं.

**<><><><><>**

पुण्यातल्या कोरेगाव पार्क इथल्या कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणी तहसीलदार आणि दुय्यम निबंधकांना निलंबित केलं असून, अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. या प्रकरणाच्या चौकशीचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. या जमीन व्यवहार प्रकरणी पार्थ पवार यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत. या व्यवहाराची महसूल आणि भूमिअभिलेख विभागाकडून संपूर्ण माहिती मागवली असून, अनियमितता असेल तर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ICC महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ चं विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघातल्या स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रिग्ज आणि राधा यादव, या महाराष्ट्रातल्या तीन खेळाडूंचा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या वर्षा निवासस्थानी सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी या तिघींना शाल, पुष्पगुच्छ, तसंच प्रत्येकी सव्वा दोन कोटी रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित केलं. तर या संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांना साडेबावीस लाख रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आलं. तर सर्व महिला क्रिकेट संघाचा सहाय्यक कर्मचारी वर्गालाही ११ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

महिला क्रिकेट संघाचा विश्वचषक कायम ठराविक देशाकडे जायचा. यंदा हा विश्वचषक भारताकडे आल्याचा आम्हा सर्वांना अभिमान वाटत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस म्हणाले. व्यावसायिक क्रिकेटमध्ये पाठिंबा असल्याशिवाय विजय मिळवता येत नाही. त्यामुळे संघाचे प्रशिक्षक, सर्व सहकारी आणि मार्गदर्शकांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केलं. भारतीय महिला क्रिकेट संघातली सर्व खेळाडू भविष्यात अनेक मुलींसाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

<><><><>

सिडनी इथं सुरू असलेल्या एनएसडब्ल्यु खुल्या स्क्वॉश स्पर्धेत भारताच्या रथिका सुथंतिरा सीलन हिने उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. तिने उपांत्यपूर्व फेरीत ऑस्ट्रेलियाच्या कॅरन ब्लूम हिच्यावर ११-८, ११-७, ११-४ असा सरळ गेम्समध्ये विजय मिळवला.

<><><><>

पुण्याच्या इंटर युनिव्हर्सिटीज सेंटर फॉर अस्ट्रॉनॉमी अँण्ड अस्ट्रोफिजिक्स अर्थात आयुका या संस्थेचे माजी संचालक आणि विख्यात शास्त्रज्ञ प्राध्यापक नरेश दधिच यांचं काल बीजिंग इथं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते ८१ वर्षांचे होते. एका परिषदेसाठी चीनला गेले असताना त्यांची तब्येत खालावली आणि उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. नरेश दधिच यांचा जन्म राजस्थानात चुरू जिल्ह्यातल्या छोट्या गावात झाला. बिट्स पिलानी, पुणे विद्यापीठ इथून शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या गणित विभागात प्राध्यापक आणि नंतर विभागप्रमुख झाले. आयुकाच्या संकल्पना, स्थापना, आणि उभारणीत त्यांची महत्त्वाची भूमिका होती.

<><><><>

ज्येष्ठ अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल दीर्घ आजारानं निधन झालं. त्या ७१ वर्षांच्या होत्या. सुलक्षणा पंडित यांनी पार्श्वगायनातून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यांनी आतापर्यंत हिंदी, मराठी, बंगाली, उडिया आणि गुजराती भाषांमध्ये गाणी गायली आहेत. सत्तरच्या दशकात त्यांनी अभिनयाची वाट चोखाळली. उलझन, संकोच, हेरा फेरी, अपनापन, खानदान, धर्म कांटा अशा विविध हिंदी चित्रपटांमधून त्यांनी भूमिका साकारल्या.

//<><><><>//